# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक १० नोव्हेंबर २०१४

## मुंबई  विद्यापीठाची ज्ञानगंगा पोहचणार अतिदुर्गम भागात

## आभासी वर्गखोलीशी ग्रामीण भागातील महाविद्यालये जोडली जाणार

## उपग्रहाद्वारे जोडली जाणार ग्रामीण भागातील महाविद्यालये

मुंबई-ग्रामीण आणि अति दुर्गम भागातील महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून धडे दिले जावेत तसेच त्यांना जगाच्या पाठीवरील तंत्रज्ञान आणि ज्ञानाचे भंडार उपलब्ध व्हावे यासाठी मुंबई विद्यापीठाने एक अभिनव प्रयोग हाती घेतला आहे. मुंबई विद्यापीठाअंतर्गत असलेली ग्रामीण आणि दुर्गम भागातील महाविद्यालये आता उपग्रहाद्वारे  जोडली जाणार आहेत.मुंबई विद्यापीठाच्या आभासी वर्गखोलीच्या ( Virtual Classroom) माध्यमातून ही ज्ञानगंगा ग्रामीण भागात पोहचणार आहे.नुकत्याच पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या प्रकल्पाला मान्यता मिळाली आहे.उपग्रहाद्वारे जोडल्या जाणा-या या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे सादरीकरण व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत करण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या आभासी वर्गखोलीच्या माध्यमातून ही सुविधा डीजीटल स्वरुपात उपलब्ध होणार असुन यामध्ये ग्रामीण भागातील महाविद्यालयांना मुंबई विद्यापीठाच्या आभासी वर्गखोलीशी जोडण्यात येणार आहे.यासाठी खास उपग्रहाच्या मदतीने दुहेरी संवादाची किमया साधणार असुन या विद्यार्थ्यांना अत्यंत सुस्पष्ट चलचित्र आणि ध्वनी प्रक्षेपण उपलब्ध करुन दिले जाणार आहे.स्टुडिओमध्ये होणारे व्याख्यान आणि जगाच्या पाठीवरील ख्यातनाम वक्त्यांचे व्याख्यान या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

विशेष तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आजमीतीला भारतात उपग्रहाच्या माध्यमातून व्यावसायिक सिनेमा जवळपास ८५०० चित्रपट गृहात एकाच वेळी दाखवला जात आहे,त्याच तंत्रज्ञानाच्या मदतीने अत्यंत कमी खर्चात ही महाविद्यालये जोडली जाणार आहेत.

संवादाची ही प्रक्रिया दुहेरी स्वरुपाची असुन यामध्ये विद्यार्थ्यांना थेट प्रश्न विचारता येणार असुन त्यांच्या शंकेचे निरसनही करता येईल.दुहेरी संभाषणाची ही कला असुन यामध्ये त्रिमती चित्र जे वास्ववाचा अनुभव देऊ शकेल असा हा प्रकल्प असणार आहे.या अभिनव उपक्रमामुळे उत्तमोत्तम आणि दर्जेदार व्याख्याने ही ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.

अनेक भागातील महाविद्यालयातून इंटरनेट जोडणीचा वेग आणि त्याची व्याप्ती यामुळे एकेरी संभाषण हे दुय्यम दर्जाचे होते.उपग्रहाच्या माध्यमातून संदेशवहन केल्यामुळे संपर्कक्षेत्र वाढेल आणि जगाच्या पाठीवर असलेल्या शिक्षकांशी थेट सवांद साधता येणार असे हे महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध स्तरातून व्यवस्थापन परिषदेच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)